1 3 APR 2026

सकाळ

# 'कॉपीमुक्त अभियानात सक्रियपणे सहभागी व्हा'

कोल्हापूर : 'शिवाजी विद्यापीठाच्या संलग्नित महाविद्यालयांतील परीक्षा निकोप, पारदर्शक व विश्वासार्ह वातावरणात पार पडण्यासाठी विद्यार्थ्यांनी कॉपीमुक्त अभियान यशस्वी करण्यासाठी सक्रिय सहभाग घ्यावा', असे आवाहन शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे उपकुलसचिव दीपक अडगळे यांनी केले. विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र आणि सांगली, सातारा विभागीय केंद्राने अभ्यासकेंद्र समन्वयक व विद्यार्थ्यांसाठी घेतलेल्या 'कॉपीमुक्त अभियान : एक चळवळ' या विषयावरील ऑनलाईन व्याख्यानात ते बोलत होते. यावेळी दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे संचालक डॉ. कृष्णा पाटील, उपकुलसचिव विनय शिंदे उपस्थित होते. डॉ. पाटील यांनी कॉपी ही यशाची वाट नसून, ती आत्मविश्वास हरविण्याची सुरुवात असल्याचे सांगितले. डॉ. सूर्यकांत गायकवाड यांनी स्वागत केले. डॉ. नितीन रणदिवे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. चांगदेव बंडगर यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

13 APR 2026 जनप्रवास


# परीक्षेदरम्यान कॉपी केल्यास कडक शिक्षा

## दीपक अडगळे : कॉपीमुक्त अभियान विद्यार्थ्यांच्या सहभागातूनच यशस्वी होईल

**जनप्रवास : कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठाच्या संलग्नित महाविद्यालयांतील परीक्षा निकोप, पारदर्शक व विश्वासार्ह वातावरणात पार पडण्यासाठी विद्यार्थ्यांनी कॉपीमुक्त अभियान यशस्वी करण्यासाठी सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे उपकुलसचिव दीपक अडगळे यांनी केले. 'कॉपीमुक्त अभियान : एक चळवळ' या विषयावरील ऑनलाइन विशेष व्याख्यानात ते बोलत होते. याचवेळी परीक्षेदरम्यान गैरप्रकार करणाऱ्यांवर भरारी पथकाकडून कडक कारवाई केली जाईल आणि परीक्षा प्रमाद समितीच्या शिक्षेस सामोरे जावे लागेल, असा इशाराही त्यांनी दिला.

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र तसेच सांगली व सातारा विभागीय केंद्राच्या वतीने अभ्यासकेंद्र समन्वयक व विद्यार्थ्यांसाठी ऑनलाइन विशेष व्याख्यान आयोजित केले होते. या कार्यक्रमास दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे संचालक डॉ. कृष्णा पाटील, उपकुलसचिव विनय शिंदे, समन्वयक, सहायक प्राध्यापक तसेच विद्यार्थी ऑनलाईन उपस्थित होते.



यावेळी अडगळे म्हणाले, महाविद्यालयीन परीक्षा काळात कॉपी किंवा तत्सम कोणतेही गैरप्रकार होऊ नयेत, यासाठी केंद्रप्रमुख, कनिष्ठ व वरिष्ठ पर्यवेक्षक तसेच विद्यार्थ्यांनी नियमांची काटेकोर अंमलबजावणी करणे अत्यावश्यक आहे. विद्यार्थ्यांमधील कॉपी करण्याची प्रवृत्ती नष्ट करून विद्यापीठाच्या परीक्षांची विश्वासार्हता वाढविण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे कॉपीमुक्त अभियानात सहभागी व्हावे, असेही त्यांनी नमूद केले. यावेळी संचालक डॉ. कृष्णा पाटील यांनी आपले विचार मांडले. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना अडगळे व डॉ. कृष्णा पाटील यांनी समाधानकारक उत्तरे दिली. स्वागत व प्रास्ताविक सातारा विभागीय केंद्राचे समन्वयक डॉ. सूर्यकांत गायकवाड यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. नितीन रणदिवे यांनी केले, तर आभार डॉ. चांगदेव बंडगर यांनी मानले.

1 3 APR 2026

पुढारी

# बसव व्याख्यानमाला बुधवारपासून

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ, शरण साहित्य अध्ययन व बसव केंद्र कोल्हापूरच्या संयुक्त विद्यमाने बसवेश्वर जयंती निमित्त बुधवार (दि. १५) ते शुक्रवारपर्यंत (दि. १७) बसव व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. ही व्याख्यानमाला दसरा चौक येथील राजर्षी शाहू स्मारक भवन येथील मिनी सभागृहात सायंकाळी ६ वाजता होणार आहे.

व्याख्यानमालेच्या बुधवारी पहिल्या दिवशी प्राचार्य डॉ. जे.एस.पाटील 'वाचन साहित्य एक समृध्द भारतीय ज्ञान परंपरा' विषयावर बोलणार आहेत. अध्यक्षस्थानी प्राचार्या डॉ. दत्ता पाटील असतील. गुरुवारी दुसऱ्या दिवशी ह.भ.प. इंद्रजित देशमुख 'अनुभवामधील चिंतन' विषयावर व्याख्यान देणार आहेत. या सत्राच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. जी. पी. माळी राहतील, तर शुक्रवारी शेवटच्या दिवशी धनाजी गुरव यांचे 'शरण संकुल आणि सत्यशोधक समाज' विषयावर व्याख्यान होणार आहे. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्रा. डॉ. भारती पाटील भूषवणार आहेत.

1 3 APR 2026

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. आंबेडकर जागतिक कीर्तीचे अर्थशास्त्रज्ञ

## पी. एस. कांबळे : मध्यवर्ती जयंती महोत्सवाच्यावतीने बिंदू चौकात व्याख्यान

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे जागतिक कीर्तीचे अर्थशास्त्रज्ञ होते. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या स्थापनेमागे त्यांचे चिंतन होते. ब्रिटिशांचे भारतीयांच्या आर्थिक शोषणाचे धोरण, भारतीय कररचना, रुपयाचे अवमूल्यन रोखणे, मध्यवर्ती बँकेची स्थापना करणे, चलन मंडळाची निर्मिती करणे यांबाबत त्यांनी मौलिक योगदान दिले असल्याचे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे माजी अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. पी. एस. तथा प्रकाश कांबळे यांनी रविवारी केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मध्यवर्ती जयंती महोत्सव समितीतर्फे रविवारी बिंदू चौकात 'डॉ. आंबेडकर यांचे आर्थिक विचार' या विषयावर व्याख्यान झाले. त्यावेळी ते बोलत होते.

डॉ. कांबळे म्हणाले, डॉ. आंबेडकर यांनी अमेरिकेच्या कोलंबिया विद्यापीठात एम. ए.करिता 'ईस्ट इंडिया कंपनीचे प्रशासन आणि वित्त' या विषयावर लघुशोधप्रबंध तर पीएच. डी.करिता 'ब्रिटिश भारतातील प्रांतिक वित्ताची उत्क्रांती' या विषयावर शोधप्रबंध सादर केला होता. त्यांनी इंग्लंडच्या 'लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स'मध्ये एम. एस्सी. आणि डी. एस्सी. या पदव्यांसाठी 'रुपयाचा प्रश्न : उद्गम आणि उपाय' हा शोधप्रबंध लिहिला होता. डॉ. आंबेडकर हे काळाच्या पुढे पाहणारे अर्थतज्ज्ञ होते. त्यांनी रुपयावर केलेले भाष्य आजही लागू पडत आहे.




कोल्हापुरात बिंदू चौकात रविवारी डॉ. पी. एस. कांबळे यांचे व्याख्यान झाले. यावेळी राजीव आवळे, सुभाष देसाई, सुभाष रामुगडे उपस्थित होते. (छाया : नसीर अत्तार)

अध्यक्षस्थानी माजी आमदार राजीव आवळे आणि डॉ. सुजित मिणचेकर होते. त्यांच्या हस्ते डॉ. कांबळे यांचा सत्कार करण्यात आला. प्रारंभी डॉ. आंबेडकर आणि महात्मा फुले यांच्या पुतळ्यांना पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. सुभाष देसाई यांनी प्रास्ताविक केले. माजी नगरसेवक सुभाष रामुगडे यांनी आभार मानले. यावेळी नगरसेवक दुर्वास कदम, डी. जी. भास्कर, उत्तम कांबळे, बाळासाहेब भोसले, प्रेमानंद मौर्य उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

1 3 APR 2026
तरुण भारत

# 'यंग स्कॉलर' स्पर्धेत स्वप्नाली देशात प्रथम

## अमेरिकेतील परिषदेत करणार भारताचे प्रतिनिधित्व; जगभरातून निवडलेल्या ७० जणांमध्ये मिळवले स्थान

- विविध मान्यवरांकडून कौतुकाचा वर्षाव

**प्रतिनिधी, कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठातील भूगोल विभागातील एम. एस्सी. जिओइन्फॉर्मेटिक्स प्रथम वर्षात (M.Sc.I) शिकणाऱ्या स्वप्नाली मगदूम या विद्यार्थिनीने ऐतिहासिक कामगिरी केली आहे. अमेरिकन आधारित आणि जीआयएस (GIS) क्षेत्रातील जगातील सर्वात मोठी संस्था असलेल्या 'एसरी' (ESRI) च्या भारतीय शाखेतर्फे आयोजित 'यंग स्कॉलर' स्पर्धेत स्वप्नालीने देशात प्रथम क्रमांक मिळवत राष्ट्रीय स्तरांवर बाजी मारली आहे.

'एसरी' या जागतिक संस्थेतर्फे दरवर्षी जगभरातील विविध देशांमधून प्रत्येकी एका गुणवंत विद्यार्थ्याची 'यंग स्कॉलर' म्हणून निवड केली जाते. २०२६ वर्षासाठी जगभरातून निवडल्या गेलेल्या अशा ७० तरुण संशोधकांमध्ये स्वप्नाली मगदूम हिने आपले स्थान निश्चित केले आहे. या निवडीमुळे तिला जुलै महिन्यात सॅन डिएगो, कॅलिफोर्निया (अमेरिका) येथे आयोजित होणाऱ्या 'ग्लोबल एसरी युझर कॉन्फरन्स' मध्ये सहभागी होण्याचे अधिकृत आमंत्रण मिळाले आहे. या जागतिक व्यासपीठावर ती भारताचे प्रतिनिधित्व करणार आहे.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात स्वप्नाली मगदूम यांचा सत्कार करताना भूगोल अधिविभागप्रमुख डॉ. सचिन पन्हाळकर, डॉ. अभिजित पाटील, डॉ. प्रशांत पाटील, डॉ. विद्या चौगुले आदी.

स्वप्नालीने या स्पर्धेसाठी `Smart FloodGuard A Mobile and IoT Based Real Time Flash Flood Monitoring, Early Warning, and Evacuation System` या विषयावर आपले संशोधन सादर केले होते. अचानक येणाऱ्या महापुराचे रिअल टाइम मॉनिटरिंग करणे, त्याबद्दल पूर्वसूचना देणे आणि आपत्ती काळात सुरक्षित बाहेर पडण्यासाठी मार्ग सुचवणे, अशी अत्याधुनिक यंत्रणा तिने विकसित केली आहे. मोबाईल ॲप आणि आयओटी तंत्रज्ञानाचा वापर करून बनवलेली ही प्रणाली आपत्ती व्यवस्थापनासाठी मैलाचा दगड ठरणार आहे.

स्वप्नालीच्या या यशामागे तिची जिद्द आणि भूगोल विभागातील तज्ज्ञांचे मार्गदर्शन लाभले आहे. या संशोधन प्रकल्पासाठी तिला भूगोल अधिविभागप्रमुख डॉ. सचिन पन्हाळकर, डॉ. अभिजित पाटील, डॉ. प्रशांत पाटील, डॉ. विद्या चौगुले, डॉ. सुधीर पवार आणि शुभम गिरीगोसावी यांचे तांत्रिक व शैक्षणिक मार्गदर्शन लाभले.

### विद्यापीठासाठी अभिमानास्पद

जगातील निवडक ७० स्कॉलर्समध्ये स्थान मिळवून ग्रामीण भागातील विद्यार्थिनीने थेट अमेरिकेतील परिषदेमध्ये स्थान प्राप्त करणे, ही बाब शिवाजी विद्यापीठासह महाराष्ट्रासाठी अभिमानास्पद आहे, अशा शब्दांत प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी तिचे अभिनंदन केले आहे.

1 3 APR 2026

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मातृसंस्कारातूनच देश सामर्थ्यवान बनेल

## प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव : दोन दिवसीय मातृसंस्कार समागमाची सांगता




कोल्हापूर : मातृसंस्कार शिबिराची रविवारी सांगता झाली. समारोप प्रसंगी बोलताना प्र कुलगुरू डॉ. ज्योती जाधव. शेजारी जयंत देशपांडे, मुकुंद भावे, रेणुकामाई, खंडेलवाल, डॉ. वृषाली जोशी, मानसी चांदवडकर.

प्रतिनिधी, कोल्हापूर

आपले घर सांभाळत इतर जबाबदाऱ्याही भारतीय महिला उत्कृष्टपणे पार पाडत आहेत. यामध्ये भरभक्कम भारतीय संस्कृतीतील संस्कार तिला दिशादर्शन करत आले आहेत. मातृसंस्कार समागमातून होणाऱ्या मातृसंस्कारांतून भारत सामर्थ्यसंपन्न बनेल, असा विश्वास शिवाजी विद्यापीठाच्या प्र कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी व्यक्त केला.

विश्वमांगल्य सभेच्या वतीने सायबर येथील आनंद भवन येथे आयोजित दोनदिवसीय 'मातृसंस्कार समागम : परंपरा, प्रगती, परिपक्वतेचा संगम' या पश्चिम महाराष्ट्र अधिवेशनाची सांगता रविवारी झाली. त्यापूर्वी सामूहीक दुर्गा सप्तश्लोकी वाचन, प्रभातफेरीला महिलांचा प्रतिसाद मिळाला. दरम्यान समागमाच्या सांगता प्रसंगी प्र कुलगुरू डॉ. जाधव प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या. अध्यक्षस्थानी रेणुकामाई होत्या. व्यासपीठावर जयंत देशपांडे, मुकुंद भावे, रेणुकामाई, रेखा खंडेलवाल, डॉ. वृषाली जोशी यांची उपस्थिती होती.

रेणुकामाई म्हणाल्या, विश्वमांगल्य सभेचे १७ वर्षापूर्वी रोपटे लावले. संघटनेने ते रूजवले आहे. आता

### मातृवात्सल्य सभेचा उपक्रम दिशादर्शक, कौतुकास्पद : रेणुकामाई

याची जबाबदारी समाजाने घेण्याची गरज आहे. नवी पिढी सुसंस्कारीत होण्यासाठी आता समाजाने विश्वमांगल्याच्या उपक्रमांना प्रतिसाद देत त्याच्या आयोजनात सहभाग नोंदवणे आवश्यन असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

सांगता कार्यक्रमाला मातृशक्ती गीताने प्रारंभ झाला. कार्यक्रमात मुकुंद भावे आणि जयंत देशपांडे यांनी मार्गदर्शन केले. प्रमुख पाहुण्यांचा माधवी शिंदे, कल्पना जाधव, डॉ. सुनिता बारी, शीतल शिंदे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. जुई कुलकर्णी, सुमेधा कुलकर्णी, संगीता राणे, डॉ. विदुला स्वामी, गजानन गुरव, वीर हनुमान शिवकालीन मर्दानी आखाडा, मानसी चांदवडकर, स्नेहल सौंदलगे, शिल्पा कामत, उत्कर्षा पाटील, उज्वला जोगदंड, निमिषा देशपांडे, प्राजक्ता डांगे, गुणाक्षी राऊळगावकर, आकांक्षा चव्हाण, मीरा पाठक, ईश्वरी पंडीत यांचा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. प्रास्ताविकात स्नेहल शिंदे यांनी अधिवेशनात डॉ. वृषाली ज़ोशी, शुभांगी मेढे, डॉ. मेधा कुलकर्णी, डॉ. प्राजक्ता देशमुख यांनी केलेले मार्गदर्शन महापौर रूपाराणी निकम, माजी जि. प. अध्यक्षा शौमिका महाडीक आणि सप्तमातृकांनी सत्कारादरम्यान केलेली मांडणी, रविवारी सकाळी निघालेली प्रभातफेरी, सामुहिक स्रोत पठण, पंच परिवर्तनाला मिळालेल्या प्रतिसादाची माहिती दिली.

### मातृत्व श्रेष्ठ आहे, ते जपायला शिका

**डॉ. ज्योती जाधव म्हणाल्या, मातृत्व खूप मोठे आहे, आपलेच श्रेय आपल्याला वाढवायचे आहे. मातृत्व श्रेष्ठ आहे, ते जपायला, मिरवायला शिका. आपले अस्तित्व जाणून घ्या, हे जाणण्याचे कार्य मातृवात्सल्य सभा करत आहे, अन् हे काम निश्चितच कौतुकास्पद असल्याचे त्यांनी सांगितले.**

जनसंपर्क कक्ष

1 3 APR 2026 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# माणूस म्हणून मान्यतेसाठीच बाबासाहेबांकडून धम्माचा स्वीकार : प्रा. सुकुमार कांबळे

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

माणूस म्हणून जगायचे असेल, तर बुद्धाच्या धम्माशिवाय पर्याय नाही, या जाणिवेतून व समता, स्वातंत्र्य आणि बंधुता या मूल्यांवर आधारित जीवन जगण्याचा मार्ग म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी गौतम बुद्धाच्या धम्माचा स्वीकार केला, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत प्रा. सुकुमार कांबळे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातर्फे आयोजित फुले-शाहू-आंबेडकर सप्ताहाचे उद्घाटन प्रा. कांबळे यांच्या हस्ते झाले. त्यावेळी 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे धम्मचिंतन' या विषयावर त्यांचे विशेष व्याख्यान झाले. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात फुले-शाहू-आंबेडकर सप्ताहाच्या उद्घाटन समारंभात व्याख्यान देताना प्रा. सुकुमार कांबळे.**

कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे होते. प्रा. कांबळे म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजातील अस्पृश्यता, अन्याय आणि विषमता अनुभवली होती. चिंतनातून १९५६ मध्ये त्यांनी बुद्धाचा धम्म स्वीकारला. हे केवळ धर्मांतर नव्हते, तर सामाजिक क्रांतीचा निर्णायक टप्पा होता. बुद्ध धर्म हा विज्ञाननिष्ठ, तर्कसंगत आणि प्रश्न विचारण्यास प्रोत्साहन देणारा आहे. अंधश्रद्धेला स्थान न देता विचारस्वातंत्र्य देतो. त्यामुळे आजच्या काळात बुद्धधम्म मानव कल्याणासाठीचा उपयुक्त मार्ग आहे.

यावेळी डॉ. व्ही. एन. शिंदे यांनीही आपले अध्यक्षिय भाषण केले. अविनाश भाले यांनी प्रास्ताविक केले. डॉ. तेजपाल मोहरेकर यांनी आभार मानले. यावेळी ज्येष्ठ विचारवंत प्राचार्य डॉ. हरिष भालेराव, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, शिक्षणशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. चेतना सोनकांबळे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

13 APR 2026 सकाळ

# स्वप्नाली मगदूम 'यंग स्कॉलर' स्पर्धेत देशात प्रथम

## अमेरिकेतील परिषदेत करणार भारताचे प्रतिनिधित्व; महापुराच्या पूर्वसूचनेबाबत संशोधन



स्वप्नाली मगदूम

कोल्हापूर, ता. १२ : शिवाजी विद्यापीठाच्या भूगोल विभागातील एम.एस्सी. जिओइन्फॉर्मेटिक्स प्रथम वर्षात शिकणाऱ्या स्वप्नाली मगदूम या विद्यार्थिनीने उत्तुंग कामगिरी केली. जीआयएस क्षेत्रातील जगातील मोठी संस्था असलेल्या अमेरिकेतील 'एसरी'च्या भारतीय शाखेने घेतलेल्या 'यंग स्कॉलर' स्पर्धेत तिने देशात प्रथम क्रमांक मिळविला आहे.

'एसरी'तर्फे दरवर्षी जगभरातील विविध देशांमधून प्रत्येकी एका गुणवंत विद्यार्थ्याची 'यंग स्कॉलर' म्हणून निवड केली जाते. २०२६ वर्षासाठी जगभरातून निवडलेल्या ७० संशोधकांमध्ये स्वप्नालीने स्थान मिळविले आहे. तिला जुलैमध्ये सॅन डिएगो, कॅलिफोर्निया (अमेरिका) येथे होणाऱ्या 'ग्लोबल एसरी युझर कॉन्फरन्स'मध्ये सहभागी होण्याचे आमंत्रण मिळाले आहे. या जागतिक व्यासपीठावर ती भारताचे प्रतिनिधित्व करेल.

स्वप्नालीने या स्पर्धेसाठी 'स्मार्ट फ्लड गार्ड : ए मोबाईल अ‍ॅण्ड आयओटी बेस्ड रियल टाइम फ्लॅश फ्लड मॉनिटोरिंग, अर्ली वॉर्निंग अ‍ॅण्ड इवॅक्युशन सिस्टीम' या विषयावर संशोधन सादर केले. अचानक येणाऱ्या महापुराचे रिअल टाइम मॉनिटरिंग करणे, त्याबद्दल पूर्वसूचना देणे आणि आपत्ती काळात सुरक्षित बाहेर पडण्यासाठी मार्ग सुचवणे, अशी अत्याधुनिक यंत्रणा तिने विकसित केली आहे. मोबाईल अ‍ॅप आणि आयओटी तंत्रज्ञानाचा वापर करून बनवलेली ही प्रणाली आपत्ती व्यवस्थापनासाठी मैलाचा दगड ठरणार आहे. तिने आधुनिक जिओस्पॅशिअल तंत्रज्ञानाचा वापर करून संशोधन प्रकल्प पूर्ण केला. तिला डॉ. सचिन पन्हाळकर, अभिजित पाटील, प्रशांत पाटील, विद्या चौगुले, सुधीर पवार, शुभम गिरीगोसावी यांचे मार्गदर्शन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

13 APR 2026

पुण्यनगरी

# स्वप्नाली मगदूम 'यंग स्कॉलर' स्पर्धेत देशात प्रथम

## अमेरिकेतील परिषदेत करणार भारताचे प्रतिनिधित्व

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील भूगोल विभागातील एम.एस्सी. जिओइन्फॉर्मेटिक्स प्रथम वर्षात शिकणाऱ्या स्वप्नाली मगदूम या विद्यार्थिनीने ऐतिहासिक कामगिरी केली आहे. अमेरिकन आधारित आणि जीआयएस क्षेत्रातील जगातील सर्वात मोठी संस्था असलेल्या 'एसरी'च्या भारतीय शाखेतर्फे आयोजित 'यंग स्कॉलर' स्पर्धेत स्वप्नालीने भारतातून प्रथम क्रमांक मिळवत राष्ट्रीय स्तरावर बाजी मारली आहे.

'एसरी' या जागतिक संस्थेतर्फे दरवर्षी जगभरातील विविध देशांमधून प्रत्येकी एका गुणवंत विद्यार्थ्याची 'यंग स्कॉलर' म्हणून निवड केली जाते. २०२६ वर्षासाठी जगभरातून निवडल्या गेलेल्या अशा ७० तरुण संशोधकांमध्ये स्वप्नाली



हिने आपले स्थान निश्चित केले आहे. या निवडीमुळे तिला जुलै महिन्यात सॅन डिएगो, कॅलिफोर्निया (अमेरिका) येथे आयोजित होणाऱ्या 'ग्लोबल एसरी युझर कॉन्फरन्स'मध्ये सहभागी होण्याचे अधिकृत आमंत्रण मिळाले आहे. या जागतिक व्यासपीठावर ती भारताचे प्रतिनिधित्व करेल. स्वप्नालीने या स्पर्धेसाठी 'स्मार्ट फ्लडगार्ड : ए मोबाईल अँड लॅट बेस्ड रिअल टाईम फ्लॅश फ्लड मॉनिटरिंग, अर्ली वॉर्निंग, अँड इव्हॅक्युशन सिस्टीम' या विषयावर आपले संशोधन सादर केले होते. अचानक येणाऱ्या महापुराचे रिअल टाईम मॉनिटरिंग करणे, त्याबद्दल पूर्वसूचना देणे आणि आपत्ती काळात सुरक्षित बाहेर पडण्यासाठी मार्ग सुचवणे, अशी अत्याधुनिक यंत्रणा तिने विकसित केली आहे. मोबाईल ॲप आणि आयओटी तंत्रज्ञानाचा वापर करून बनवलेली ही प्रणाली आपत्ती व्यवस्थापनासाठी मैलाचा दगड ठरणार आहे.

स्वप्नालीच्या या यशामागे तिची जिद्द आणि भूगोल विभागातील तज्ज्ञांचे मार्गदर्शन लाभले आहे. या संशोधन प्रकल्पासाठी तिला भूगोल अधिविभागप्रमुख डॉ. सचिन पन्हाळकर, डॉ. अभिजित पाटील, डॉ. प्रशांत पाटील, डॉ. विद्या चौगुले, डॉ. सुधीर पवार आणि शुभम गिरीगोसावी यांचे तांत्रिक व शैक्षणिक मार्गदर्शन लाभले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली तिने आधुनिक जिओस्पॅशिअल तंत्रज्ञानाचा वापर करून हा प्रकल्प यशस्वीरीत्या पूर्ण केला.

ग्रामीण भागातील विद्यार्थिनीने थेट अमेरिकेतील परिषदेमध्ये स्थान प्राप्त करणे, ही बाब शिवाजी विद्यापीठासह महाराष्ट्रासाठी अभिमानास्पद आहे, अशा शब्दांत प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी तिचे अभिनंदन केले आहे.